| | | |
|---|---|---|
| **CNR.NO. MHPU260015482013** | खटला दाखल तारीख | २३/०७/२०१३ |
| | पंजीकृत तारीख | २३/०७/२०१३ |
| | निकालाची तारीख | ०२/०२/२०२६ |
| | कालावधी १२ वर्षे, ११ महिने, ०९ दिवस | |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वडगांव मावळ यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अभय म. विभुते यांचे समक्ष)**
**न्यायनिर्णय घोषित दिनांक ०२ जुलै, २०२६**
**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७८०/२०१३)**

| | |
|---|---|
| | गुन्हा रजिष्टर क्रं.१५९/२०१३, पोलीस ठाणे–देहुरोड, जि. पुणे. |
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन,<br>देहुरोड पोलीस ठाणे,<br>जि. पुणे. |
| अभियोगपक्षामार्फत | सहा.सरकारी अभियोक्ता–श्री. आर. एन. विरकुड. |
| आरोपी | रोहन प्रशांत चव्हाण,<br>वय २६ वर्षे, व्यवसाय–चालक,<br>रा.आंबेडकरनगर, येरवडा, जि. पुणे. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. मुनाफ शेख. |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०५/०६/२०१३ |
| फिर्याद दाखल दिनांक | ०८/०६/२०१३ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | १३/०७/२०१३ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०२/०२/२०२७ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०२/०२/२०२७ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – |

**<u>आरोपीची माहिती.</u>**

| आरोपीचा अनु क्रं. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील कलम | निर्दोष किंवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपीने भोगलेल्या कारावासाचा कालावधी कलम ४२८फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहन प्रशांत चव्हाण | १२/०६/१३ | १२/०६/१३ | भादवी कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.व्हे. कलम १८४ अन्वये | निर्दोष | – | – |

**<u>भाग 'क'</u>**

## (**Para** 44(**iii**) **of Ch apter VI of Criminal Manual**)

**अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार.**

अ. अभियोगपक्ष–

| साक्षीदाराचा अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अभि. सा.क्रं.०१ | अक्षय अभिजीत पवार | साक्षीदार |
| अभि. सा.क्रं.०२ | रोशणी अर्जुन नऱ्हे | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| अभि. सा.क्रं.०३ | रेखा गजानन वडसे | फिर्यादी |
| अभि. सा.क्रं.०४ | रमेश कृष्णा निरावडे | तपासी अधिकारी |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| आरोपी.सा.क्रं.०१ | निरंक | निरंक |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार तपासणेत आला असल्यास–

| साक्षीदाराचा अनु.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| न्याया.सा.क्रं.०१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाने/ आरोपीने/ न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे**

अ. अभियोग पक्ष–

| अनु.क्रं. | निशाणी क्रं. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | नि.क्रं.४४ | फिर्याद |
| ०२ | नि.क्रं.४७ | घटनास्थळ पंचनामा |
| ०३. | नि.क्रं. ४८ व ४९ | आरटीओ पत्र व अहवाल |

ब. बचावपक्ष–

| अनु.क्रं. | निशाणी क्रं. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे–

| अनु.क्रं. | निशाणी क्रं. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ड. मुद्देमाल–

| अनु.क्रं. | निशाणी क्रं. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**
**(अधिघोषित दिनांक ०२/०७/२०२६)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये खटला दाखल करण्यात आला आहे.

**<u>अभियोगपक्षाच्या खटल्याची हकीकत खालीलप्रमाणे आहे</u> :–**

**०२.** फिर्यादी ही खाजगी नोकरी करतात. दि. ०५/०६/२०१३ रोजी सायंकाळी ६.३० वाजता फिर्यादी, आरोपी व इतर असे सर्वजण चित्रपट पाहण्याकरीता आरोपीची चार चाकी क्र.एम.एच.१२/एफ.यु–१२५० याने गेलेले होते. त्यानंतर चित्रपट पाहुन कान्हे फाटा येथे ढाब्यावर जेवण करुन पुणे ते मुंबई या महामार्गावरुन देहुरोडकडे जात असताना रात्री ८.०० वाजता समोरुन येणारे एस.टी बसची धडक टाळण्याकरीता आरोपीचे वाहनावरील नियंत्रण सुटले व त्यामुळे अपघात होवून फिर्यादी व आरोपीस मुका मार लागला तर साक्षीदार अक्षया हिच्या चेहऱ्यास व नाकास दुखापत झाली. तसेच रोशणी हिच्या पायाच्या पांडीस दुखापत झाली. त्यामुळे त्यांना उपचाराकामी आधार हॉस्पीटल येथे भरती केले. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन देहुरोड येथे घटनेची फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरील फिर्याद वरुन पोलीस ठाणे, देहुरोड येथे गु.र.क्रं. १५९/२०१३, भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला. तसेच, फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. अपघातातील वाहनाचे कागदपत्र छायांकित प्रत हस्तगत केले. त्यानंतर आरोपीस अटक केली. तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४.** या न्यायालयाचे पुर्वपीठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ वर दोषारोप (नि.क्रं.१०) निश्चित करण्यात आले. आरोपीने त्यांच्यावर लावण्यात

आलेले आरोप नाकारले आणि संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन (नि.क्रं.५०) नोंदवण्यात आले. त्यामध्ये त्यांनी त्यांच्याविरुध्द प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

**०५.** अभियोगपक्षाचे खटल्याचे कथन विचारात घेता, खालील मुद्दे माझे विचारार्थ आले. त्यावर मी खालीलप्रमाणे कारण–मिमांसेनुसार निष्कर्ष नोंदविले आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) दिनांक ०५/०६/२०१३ रोजी रात्री ०८.०० वाजता देहुरोड, ता. हवेली, जि. पुणे आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवितास धोका निर्माण होईल आणि एखादया व्यक्तीस दुखापत, अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच.१२/एफ.यु–१२५० ही भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून भा.द.वि.चे कलम २७९ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| २) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवितास धोका निर्माण होईल आणि एखादया व्यक्तीस दुखापत, अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील वाहन ही भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी व साक्षीदार यांना साधी दुखापत पोहचवुन भा.द.वि.चे कलम ३३७ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| ३) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवितास धोका निर्माण होईल आणि एखादया व्यक्तीस दुखापत, अगर नुकसान पोहचवण्याचा संभव होईल अशा प्रकारे त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी व साक्षीदार यांना गंभीर दुखापत पोहचवुन भा.द.वि.चे कलम ३३८ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |

| | |
|---|---|
| ४) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवून त्यांच्या वाहनाच्या नुकसानीस कारणीभुत झालात व भा.द.वि.चे कलम ४२७ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| ५) वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमविरुध्द भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवून व मोटारवाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द् केली काय ? | ...नकारार्थी. |
| ६) आदेश काय ? | ...आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

**०६.** अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता घटनेच्या दिवशी आरोपीने देहुरोड, ता. हवेली, जि. पुणे येथे त्यांच्या ताब्यातील वाहन एम.एच.१२/एफ.यु–१२५० ही सार्वजनिक वाहतुकीचे नियमांचे उल्लंघण करुन रोडवर भरधाववेगाने व निष्काळजीपणाने मानवी जीवीतास धोका निर्माण होईल अशाप्रकारे चालवून फिर्यादी व साक्षीदार यांना साधी दुखापत पोहचवली ही बाब संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ ते ०५ करीता</u> :–**

**०७.** मुद्दा क्र.०१ ते ०५ हे एकमेकांशी निगडीत असल्याने व त्याबाबतचा पुरावा एकसारखा असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरीता व सोयीकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवण्यात येत आहे.

**०८.** अभियोगपक्षातर्फे आरोपीवील दोषारोप सिद्ध करण्याकामी फिर्यादी तथा साक्षीदार क्रं.०३ नामे रेखा यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. त्यामध्ये फिर्यादी यांनी कथन केले की, घटना दि. ०५/०६/२०१३ रोजी घडली. सदर दिवशी ते व सोबत अक्षया व रोशणी असे सर्वजण चित्रपट पाहण्याकरीता जात

असताना समोरुन वाहन येत असल्याने आरोपीने ते बसलेल्या वाहचानाचा अचानक ब्रेक लागल्याने रोशणी हिच्या पायास तर अक्षया हिच्या जबडयास व त्यांचया खांदयास दुखापत झालेली होती. त्यामुळे त्यांना रुगणालयात भरती करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना घटनेची फिर्याद नि.क्र. ४४ नोंदवली. त्यावर त्यांची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यामध्ये त्यांना प्रस्तुत फिर्याद पुढे चालवायची नसल्याचे कथन करुन आरोपीची अपघातामध्ये चुक नसल्याचे कथन केलेले आहे.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ नामे अक्षया व साक्षीदार क्र. ०२ रोशणी यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, दि. ०५/०६/२०१३ रोजी ते चित्रपट पाहण्याकरीता गेले होते व त्यानंतर परत येत असताना आरोपी हे वाहन क्र एम.एच–१२/एफ.यु–१२५० चालवत होते. त्यावेळी अपघात झाला होता. साक्षीदार क्र. ०१ यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यामध्ये आरोपीच्या चुकीमुळे अपघात झालेला नाही व समोरुन वाहन आल्यामुळे अचानक ब्रेक दाबल्यामुळे अपघात झालेला आहे. साक्षीदार क्र. ०२ यांनी त्यांच्या साक्ष पुराव्यामध्ये आरोपी हे अपघातास कारणीभुत असलेले वाहन चालवत होते व ते पाठीमगील सीटवर बसलेले असताना त्यांचे वाहन पलटी झाले. त्यामुळे त्यांच्या मांडीस दुखापत झाली. अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे कथन केलेले आहे.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ तथा तपासीक अधिकारी यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ४७ तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवीले. अपघातातील वाहनाची आर.टी.ओ कार्यालयामार्फत तपासणी करुन अहवाल नि.क्र. ४७ व ४८ हस्तगत केला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**११.** एकंदरीत अभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, घटनेच्या दिवशी फिर्यादी, जखमी साक्षीदार व आरोपी असे सर्वजण आरोपीच्या वाहनातुन चित्रपट पाहण्याकरीता गेलेले होते व त्यानंतर परत येताना देहुरोड येथे अपघात झालेला आहे. साक्षीदार क्र. ०३ तथा फिर्यादी नामे रेखा, साक्षीदार क्र. ०१ नामे अक्षया यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे व आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने सार्वजनीक रस्त्यावर चालवल्याचे स्पष्टपणे नाकारलेले आहे. साक्षीदार क्र. ०२ नामे रोशणी यांनी अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे कथन केलेले आहे. परंतु त्या वाहनामध्ये पाठीमागील बाजुस बसलेल्या होत्या. त्यामुळे अपघात नेमका कशामुळे झाला याबाबत त्यांनी त्यांच्या साक्षपुराव्यामध्ये काही एक कथन केलेले नाही. अभियोगपक्षाच्या साक्ष पुराव्यावरुन असे दिसून येते की, घटनेच्या वेळी आरोपी चालवीत असलेले वाहनासमोर समोरुन एस.टी. बस आल्याने आरोपीने त्यांच्या वाहनाचा ब्रेक दाबला व त्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटुन अपघात झालेला आहे. त्यामुळे अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झालेला असल्याचे दिसून येत नाही. त्याबाबत फिर्यादी तथा साक्षीदार क्र. ०३ व साक्षीदार क्र.०१ यांनी अपघातामध्ये आरोपीची कोणतीही चुक नसल्याचे कथन केलेले आहे. याव्यतिरिक्त् अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवली नाही. त्यामुळे घटनेच्या दिवशी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच.१२/एफ.यु.–१२५० ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने सार्वजनीक रस्त्यावर मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा परिस्थितीत चालवून फिर्यादी व साक्षीदार यांना गंभीर दुखापत पोहोचवली व त्यांच्या ताब्यातील वाहन वाहतुकीचे नियमविरुध्द भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालवीले ही बाब पुराव्या अभावी सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रं.०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रं.०५ करीता</u> :–**

**१२.** वर चर्चिलेनुसार आरोपीविरुध्दचे दोषारोप अभियोगपक्षातर्फे संशयापलीकडे सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपीस संशयाचा फायदा देवून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) अन्वये त्यांचे बंधपत्र अभिलेखावर दाखल करणे बाबतचे निर्देश देणे अनिवार्य आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रं.०५ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

–: **<u>आ दे श</u> :–**

०१. आरोपी **रोहन प्रशांत चव्हाण** फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ चे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

०२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

०३. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र कलम ४३७ (अ) फौजदारी प्रक्रीया संहीतेचे पुर्ततेकरीता पुढील सहा महिन्यांकरीता कायम करण्यात येत आहेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित व निर्गमीत करण्यात आले.)

ABHAY MALLIKARJUN VIBHUTE

Digitally signed by ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Date: 2026.07.02 16:51:33 +0530

**(अभय म. विभुते),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
वडगांव मावळ, पुणे.

दिनांक : ०२/०७/२०२६
ठिकाण : वडगांव मावळ.